सेवानिवृत्तिचे वय 60 वर्षांऐवजी 58 वर्षे विहित करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक सेनिवे-1099/34/सेवा-4,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 2 फेब्रुवारी 1999.

पहा :- (1) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-1098/45/सेवा-4, दिनांक 29 मे 1998.

(2) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-1098/45/सेवा-4, दिनांक 31 ऑक्टोबर 1998.

शासन निर्णय

वरील संदर्भ क्रमांक (1) येथील शासन निर्णयानुसार ज्यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे होते असे शासकीय कर्मचारी/जिल्हा परिषद कर्मचारी व ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केलेली आहे व ज्यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे होते अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील कर्मचारी यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षांपर्यन्त वाढविण्यात आले होते. संदर्भ क्रमांक (2) येथील शासन अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील नियम 10(1) व (2) मध्ये त्याप्रमाणे आवश्यक ती सुधारणाही करण्यात आलेली होती.

2. या संदर्भात पुनर्विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, -

अन्यथा विनिर्दिष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करुन, ज्यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षे वाढविण्यात आलेले आहे असा प्रत्येक शासकीय कर्मचारी आता ज्या महिन्यात 58 वर्षे वयाचा होईल त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवेतून निवृत्त होईल. तथापि, ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख महिन्याच्या 1 तारखेला असेल तो कर्मचारी 58 वर्षे वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल.

हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. जे कर्मचारी वरील संदर्भ क्रमांक (1) व (2) येथील आदेशानुसार वयाची 58 वर्षे पूर्ण झाल्यानंतरही, हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकास, सेवेत आहेत असे कर्मचारी या आदेशाच्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवेतून निवृत्त होतील व त्यांचा सेवानिवृत्तिचा दिनांक तोच राहील.

3. सेवानिवृत्तिचे वय 60 वर्षांवरुन 58 वर्षे विहित करण्याच्या परिणामी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये यांना विनंती करण्यात येते की, सरळ नियुक्त्या तसेच पदोन्नत्यांच्या संदर्भात सेवानिवृत्तिमुळे रिक्त होणा-या पदांचे पुनर्विलोकन करण्यात यावे, जेणेकरुन आवश्यकतेपेक्षा अधिक नियुक्त्या होणार नाहीत किंवा अधिसंख्य पदांच्या निर्मितीस कारणीभूत ठरणारे न्यायालयीन दावे दाखल केले जाणार नाहीत किंवा सेवानिवृत्तिमुळे रिक्त झालेल्या पदांच्या संख्येत वाढ झाल्याच्या परिणामी विचार-क्षेत्रात बदल झाल्यामुळे विभागीय पदोन्नती समित्यांमार्फत पुनर्विलोकन करावे लागणार नाही.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1962 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम 248 च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधील ज्या कर्मचा-यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षांपर्यन्त वाढविण्यात आले होते, अशा कर्मचा-यांनाही लागू राहील.

5. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील ज्या कर्मचा-यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षे वाढविण्यात आलेले होते, अशा कर्मचा-यांनाही वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

6. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि मु. कुन्दिराजा,
शासनाचे प्रधान सचिव.

सेवानिवृत्तिचे वय 60 वर्षांऐवजी 58 वर्षे विहित करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक सेनिवे-1099/34/सेवा-4,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 2 फेब्रुवारी 1999.

पहा :- (1) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-1098/45/सेवा-4, दिनांक 29 मे 1998.

(2) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे-1098/45/सेवा-4, दिनांक 31 ऑक्टोबर 1998.

## शासन निर्णय

वरील संदर्भ क्रमांक (1) येथील शासन निर्णयानुसार ज्यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे होते असे शासकीय कर्मचारी/जिल्हा परिषद कर्मचारी व ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केलेली आहे व ज्यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षे होते अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील कर्मचारी यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरून 60 वर्षांपर्यन्त वाढविण्यात आले होते. संदर्भ क्रमांक (2) येथील शासन अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील नियम 10(1) व (2) मध्ये त्याप्रमाणे आवश्यक ती सुधारणाही करण्यात आलेली होती.

2. या संदर्भात पुनर्विचार करुन शासन असे आदेश देत आहे की, -

अन्यथा विनिर्दिष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करुन, ज्यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षे वाढविण्यात आलेले आहे असा प्रत्येक शासकीय कर्मचारी ज्या महिन्यात 58 वर्षे वयाचा होईल त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवेतून निवृत्त होईल. तथापि, ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख महिन्याच्या 1 तारखेला असेल तो कर्मचारी 58 वर्षे वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल.

हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. जे कर्मचारी वरील संदर्भ क्रमांक (1) व (2) येथील आदेशानुसार वयाची 58 वर्षे पूर्ण झाल्यानंतरही, हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकास, सेवेत आहेत असे कर्मचारी या आदेशाच्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवेतून निवृत्त होतील व त्यांचा सेवानिवृत्तिचा दिनांक तोच राहील.

3. सेवानिवृत्तिचे वय 60 वर्षांवरुन 58 वर्षे विहित करण्याच्या परिणामी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये यांना विनंती करण्यात येते की, सरळ नियुक्त्या तसेच पदोन्नत्यांच्या संदर्भात सेवानिवृत्तिमुळे रिक्त होणा-या पदांचे पुनर्विलोकन करण्यात यावे, जेणेकरुन आवश्यकतेपेक्षा अधिक नियुक्त्या होणार नाहीत किंवा अधिसंख्य पदांच्या निर्मितीस कारणीभूत ठरणारे न्यायालयीन दावे दाखल केले जाणार नाहीत किंवा सेवानिवृत्तिमुळे रिक्त झालेल्या पदांच्या संख्येत वाढ झाल्याच्या परिणामी विचार-क्षेत्रात बदल झाल्यामुळे विभागीय पदोन्नती समित्यांमार्फत पुनर्विलोकन करावे लागणार नाही.

4. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 (सन 1962 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम 248 च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधील ज्या कर्मचा-यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षांपर्यन्त वाढविण्यात आले होते, अशा कर्मचा-यांनाही लागू राहील.

5. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील ज्या कर्मचा-यांचे सेवानिवृत्तिचे वय 58 वर्षांवरुन 60 वर्षे वाढविण्यात आलेले होते, अशा कर्मचा-यांनाही वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

6. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील यासंबंधीच्या विद्यमान तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू. बुद्धिराजा,
शासनाचे प्रधान सचिव.

प्रति,

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे. १९९९ चा क्रमांक

एच-1196 (15000+40-2-99)अ.